<u>राज्य योजना सन २०१९-२०२०</u>
नागपूर जिल्ह्यातील गोरेवाडा येथील प्रस्तावित प्राणी संग्रहालयाची प्राथमिक कामे (४४०६-३८५८) अंतर्गत चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांकः डब्ल्यूएलपी-०५.१९/प्र.क्र. १४७ /फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २९ जुलै, २०१९.

<u>वाचा</u> :-

१. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.१८/१७४/१९-२०, दिनांक :- १४.०५.२०१९.
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांकः डब्ल्यूएलपी-०५.१९/प्र.क्र. १४७ /फ-१, दिनांक १६.०५.२०१९.
४. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०८.०७.२०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

सन २०१९-२०२० मध्ये राज्यस्तरीय योजनेतंर्गत नागपूर जिल्ह्यातील गोरेवाडा येथील प्रस्तावित प्राणी संग्रहालयाची प्राथमिक कामे (४४०६-३८५८) या लेखाशिर्षांतर्गत रुपये २०००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. संदर्भ क्रमांक ४ च्या परिपत्रकात **"सन २०१९-२०२० च्या अर्थसंकल्पीय तरतूदींची मासिक निधी विवरणपत्रे अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) प्रशासकीय विभागाकडून नोंदविण्यात आल्यानंतर सन २०१९-२०२० च्या प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०१९ अखरे) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० टक्केच्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) वितरीत केला जाईल."** असे नमूद करण्यात आले आहे. त्या नुसार नागपूर जिल्ह्यातील गोरेवाडा येथील प्रस्तावित प्राणी संग्रहालयाची प्राथमिक कामे (४४०६-३८५८) या राज्य योजनांतर्गत सन २०१९-२०२० मध्ये रु. १२००.०० लक्ष निधी वितरीत करण्यास विभागास अधिकार प्रदान करण्यात आले आहे.

३. वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक १ च्या शासन परिपत्रकानुसार सन २०१९-२०२० राज्य योजना नागपूर जिल्ह्यातील गोरेवाडा येथील प्रस्तावित प्राणी संग्रहालयाची प्राथमिक कामे (४४०६-३८५८) अंतर्गत संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयानुसार रु. ६६६.६४ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. आता सदर योजनांतर्गत **(वितरीत करावयाची रुक्कम रु. १२००.०० वजा आतापर्यत वितरीत केलेला रु. ६६६.६४ लक्ष उर्वरित रु. ५३३.३६ लक्ष)** रु. ५३३.३६ लक्ष निधी वितरणासाठी शिल्लक आहे.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये सन २०१९-२०२० करीता नागपूर जिल्ह्यातील गोरेवाडा येथील प्रस्तावित प्राणी संग्रहालयाची प्राथमिक कामे (४४०६-३८५८) या योजनेतर्गत रु. २०००.०० लक्षचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे. त्या अनुषंगाने शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सादर केलेले प्रस्ताव व नागपूर जिल्ह्यातील गोरेवाडा येथील प्रस्तावित प्राणी संग्रहालयाची प्राथमिक कामे (४४०६-३८५८) या योजने अंतर्गत उपलब्ध निधीच्या अनुषंगाने व्हायबलीटी गॅप फंडीगकरिता सदर शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून **रुपये ५३३.३६ लक्षच्या प्रस्तावास** शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

I. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी नागपूर जिल्ह्यातील गोरेवाडा येथिल प्रस्तावित प्राणीसंग्रहालयाची प्राथमिक कामे करण्याकरिता शासनाकडून अपेक्षित व्हायबीलीटी गॅप फंडींग यापूर्वी देण्यात आलेले नाही याची खातरजमा करुनच निधी वितरीत करावा.

II. प्रस्तावीत खर्चः- लेखाशिर्ष ४४०६, वनीकरण व वन्य जीवन यांवरील भांडवली खर्च ०२, पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, १११ प्राणी संग्रहालय, (००) (०१) गोरेवाडा येथील प्रस्तावित प्राणी संग्रहालयाची प्राथमिक कामे (राज्य) ४४०६ ३८५८ या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२०२० मध्ये अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणा-या अनुदानातून खर्च करण्यात यावा.

III. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच, प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी वितरीत करावा.

IV. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

V. प्रस्तावित असलेल्या मोठ्या बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची संबंधित जबाबदारी नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील. कोणत्याही प्रकारची वित्तीय अनियमितता होऊ न देण्याचीही जबाबदारी त्यांची असेल.

VI. कार्यबाबींमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक :- १७.०४.२०१५, क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ व दिनांक ०८.०७.२०१९ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ व दिनांक ०८.०७.२०१९ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२९१४३३०४१४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL DESHBHRATAR

Digitally signed by SWAPNIL DESHBHRATAR
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386,
postalCode=400037, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=ce420aedd83773a67f861ab4c751835b3c5119f8fc41f2f3aa39bd7749dc02e0,
ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL DESHBHRATAR
Date: 2019.07.29 14:39:35 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

३. व्यवस्थापकीय संचालक, एफ. डी. सी. एम. ली., नागपूर.
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर.
६. ब-१, फ-२,फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.